# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०२९, जमीन महसूल**<br>**रूपये:- ८,५२,३५,४९,०००/-**<br>**श्री. हारुन खान** |
| (१) | २३९ | १०० | मौजे चांडोली,( ता.खेड,जि.पुणे ) येथील जमिन गट नं.१२६ चे क्षेत्र १ हे. २४ आर सरकार जमा करण्याचा तहसिलदार, खेड यांनी दिलेला आदेश, श्री. काळुराम तुळशीराम बनकर यांनी श्रीमती शैला रमेख तायडे व इतर ५ यांच्याकडून जिल्हाधिकारी कार्यालय (कुळकायदा शाखा) आदेश क्र. पीटीआय/वतन/एसआर/४/२०१९ नुसार विक्री परवानगी घेउन सदर भोगवटा वर्ग २ जमिन खरेदी करण्यात येणे, तहसिलदार खेड यांनी दि.७.१.२०२० रोजी पत्र देउन ५० टक्के नजराणा भरुन अकृषक वापरासाठीची परवानगी देणे व भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरण होउन १०४ व्यक्तींनी प्लॉट खरेदी केलेले असणे, जिल्हाधिकारी (कुळकायदा शाखा) पुणे यांचे दि.२१.९.२०२२ पत्र क्र.पीटीआय/कावि/२३५३ नुसार तहसिलदार खेड यांना जमिन सरकार जमा करणेबाबत प्राधिकृत असणे, तत्कालिन तहसिलदार यांनी भोगवटा १ मध्ये रुपांतर करण्याचा आदेश निर्गमित केला असेल तर सरकार जमा करण्याबाबतची सुनावणी समकक्ष तहसिलदार ऐवजी जिल्हाधिकारी यांच्यापुढे होणे गरजेचे असतांना तसेच प्लॉटधारकांची बाजू न ऐकणे, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर सुनावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२) | २९५ | १० | भूदान चळवळीमुळे शासनाने - भूमी वाटप कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यामधील ७ गावांतील शेतकऱ्यांना जमिनी देणे, मात्र त्यांना अजूनही अधिकृत सीमांकन करून दिले नसणे, त्यामुळे ५० वर्षापासून काही धनदांडग्यांचा या जमिनीवर कब्जा असणे, दुसरीकडे १२८ लाभार्थ्यांना भूमिहिनांचे जीवन जगावे लागत असल्याने या भूमिहिनांमध्ये व स्थानिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने चौकशी करुन भूमिहिनांना न्याय देण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | २९७ | १० | गोंडपिपरी ( जि. चंद्रपूर) तालुक्यातील मौजा राळापेठ येथील अधिकार अभिलेख पंजी उपलब्ध नसल्याने सदर गावातील अभिलेख दुरूस्ती करीता (भोगवटदार वर्ग २ चे १) मध्ये परार्वतीत करण्याकरीता शेतकऱ्यांना अडचणीचे ठरत असणे, अनेक शेतकऱ्यांची शेती 'वडीलोपार्जीत असुन सुध्दा अजुनही भोगवटदार वर्ग १ मध्ये परावर्तीत न झाल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असणे, गोंडपिपरी तालुक्यातील काही महसुली साज्यांची अधिकार अभिलेख पंजी उपलब्ध असल्याने त्या-त्या तलाठी साज्याचा रेकार्ड दुरूस्ती झालेला असणे, परंतु मौजा राळापेठ या गावाची अधिकार अभिलेख पंजी तहसिल कार्यालय / भुमिअभिलेख कार्यालय गोंडपिपरी येथे उपलब्ध नसल्याने रेकार्ड दुरूस्ती करीता अडचण निर्माण होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (४) | २५७ | १०० | कांदिवली (प) येथील चारकोप परिसरातील सुमारे ११६ एकर भूखंड, कांदिवली औद्योगिक वसाहतीला अटी-शर्तींच्या आधीन राहून, औद्योगिक प्रयोजनासाठी प्रती चौ.मी. ६६ रुपये या माफक दराने वितरीत केलेल्या भूखंडाचा औद्योगिक वापर न करता नियमांचे उल्लघन करुन बार, रेस्टॉरंट, कापड दुकाने, जीम, पब, खाजगी वितरक, लॉज, कार शोरूम आदि खाजगी वापरासाठी सदर भूखंडाचा वापर करुन तसेच सदर भूखंड शासनाची परवानगी न घेता परस्पर विक्री करुन शासनाचा महसूल बुडवून शासनाचे कोट्यावधी रुपयाचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५) | ३१२ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातीलतील वरोरा तालुक्यातील अरविंदो रिऑलिटी ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.कंपनी व्यवस्थापनाने शासनाची कोणतीही मंजूर न घेता नियमबाहय मौजा किलोरा-बेलोरा-जेमा इजिमा रस्ता १६ या रस्त्याचे खोदकाम करणे, रस्त्याच्या खोदकामामुळे बेलोरा, टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या परिसरातील शेकडो लोकांचा जाणा-येण्याचा मार्ग बंद करणे, गावकऱ्यांच्या विरोध असतांना सुध्दा रस्त्याचे खोदकाम करणे, बेलोरा, टाकळी, जेमा, पानवडाळा, कानसा, किलोनी या गावाचे पुनर्वसन अघापही करण्यात आले नसतांनाही कंपनी व्यवस्थापनाने कायदा हातात घेऊन परिसरातील नागरिकांना वेठीस धरून त्यांना माणसिक व आर्थीक त्रास देणे, ग्रामसभेचा ठराव असून सुध्दा या ठरावाच्या विरोधात जाऊन कंपनीने नियमबाहय काम करणे, याबाबत नागरिकांनी ग्रामसभेच्या ठरावासह लेखी तक्रार चंद्रपूरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | यांना करून सुध्दा याबाबत अघापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, कंपनीने बेकायदेशिर रस्ता खोदून नागरिकांचा रस्ता बंद करणाऱ्या कंपनी व्यवस्थापना विरोधात फौजदारी कारवाई करण्याची मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६) | २०३ | १० | मुंबई उपनगारातील अंधेरी (पश्चिम) येथे शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय कामगारांच्या घरांसाठी भूखंड असणे, सदरचा भूखंडावर उद्योग भवन उभारण्याच्या नावाखाली मे. हबटाऊन प्रा.लि. या विकासकाला विकास करण्यासाठी देण्यात आला असणे, तथापि शासनाकडे अंधेरी (प.) आंबिवली येथील नगर भूमापन क्र.१४१ (अ) या भूखंडाच्या १८,७८५चौ.मी. क्षेत्रफळा पैकी १४,२७० चौ.मी. भूखंडावर मे.आकृती सिटी लि.मुंबइ यांना प्रथम ३० वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आला असणे, सदरच्या विकासकाने विविध कामे विना वेळेवर केली नसणे, कामात अनियमतता असणे, उद्योग भवनाचे काम अपूर्ण असणे, त्याच प्रमाणे सर्व्हे क्र.१४१ (अ) उद्योग भवन व चुनाभट्टी येथील न.भू.क्र. ६२७ येथे अद्याप शासकीय निवासस्थाने बांधली नसणे, उद्योग भवनाचे काम अपूर्ण असणे, कामात अनियमितता असणे, कामे वेळेत पूर्ण झाली नसणे, विविध तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असणे, त्यामुळे लिज वाढविण्याची आवश्यकता नसणे, लिज रद्द करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- ३,३८,५९,६९,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (७) | २४८ | १० | जि.रत्नागिरी,राजापूर तालुक्यातील मौजे रायपाटण ग्रामपंचायतीने रायपाटण येथे नवीन अप्पर तहसिलदार कार्यालय सुरु करण्याच्या केलेल्या मागणीनुसार शासनाने याबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही अद्याप यावर शासनाकडुन कोणतीच कार्यवाही झाली नसल्याची बाब निदर्शनास येणे. रायपाटण हे ऐतिहासिक नगर असुन मध्ययुगापासुन पेशवे कुळापर्यंत सुभ्याचे (तालुक्याचे) ठिकाण असणे. सदरहु रायपाटण नगरात ग्रामीण रुग्णालय, पोलीस दूरक्षेत्र, समाजकल्याण विभाग विद्यार्थी वसतीगृह असुन या ठिकाणी क्रिडा संकुल उभारण्यासाठी शासनाने निधी मंजुर करण्यात येणे. सद्यःस्थितीत राजापूर तालुक्याचे ठिकाण हे दुर अतंरावर असल्याने स्थानिक ग्रामस्थ जनतेस तालुका स्तरावरील शासकीय कामे, दळण-वळण व रहदारी करण्यास गैरसोयीचे होऊन त्रासदायक ठरणे. याकरिता रायपाटण ग्रामपंचायतीच्या सरपंचाने राजापूर तालुक्याचे विभाजन करुन पूर्व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विभागासाठी स्वतंत्र तालुक्याची १९९० पासुन अनेक लोकप्रतिनिंधीनी सातत्याने आणि त्यानंतर दि.७.१०.२०२४ रोजी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडुन कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे. याबाबत शासनाने ३४ वर्षापासुन प्रलंबित असलेल्या तहसिल कार्यालय निर्मिती प्रस्तावास शासनाने मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०३०, मुद्रांक व नोंदणी**<br>**रूपये:- ४,५२,७४,६९,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (८) | २५५ | १०० | मुंबई शहर आणि उपनगर जिल्हा, पुणे शहर आणि जिल्हा या चार जिल्ह्यातील सन २०१९-२०२४ या कालावधीतील बक्षिसपत्रे, खरेदी खत, जमीन हस्तांतरण अशी सुमारे ३५ लाख दस्तांच्या तपासणीत शासनाच्या तपासणी पथकास स्थावर संपदा तथा मालमत्ता (महारेरा), आकृशक (एनए), तुकडे बंदी नियम आदि कायद्याचे उल्लंघन करुन झालेल्या सुमारे १ हजाराहून अधिक दस्तांची नोंदणीत शासनच्या कोट्यावधी महसूलाचे नुकसान झाले आहे. सदरहू दस्तावेजांची नोंदणी करताना ७२० पेक्षा अधिक दस्तांमधून कमी रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरणे तसेच कमी क्षेत्र दस्त नोंद केल्याचे आक्षेप तपास पथकाने नोंदवून 35 लाख दस्तावेजांचा तपासणी अहवाल शासनास सादर केला आहे. सदरहू प्रकरणात शासनास प्राप्त झालेल्या तपासणी अहवालानुसार शासनाचे एकूण नुकसान झालेल्या महसूलाचे वसूल करण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | २०४ | १० | महसूल वाढीसाठी राज्य शासनाने मुद्रांक शुल्कात ५ पट वाढ करणे, राज्य शासनाने महसूल वाढीसाठी रु. १००/- रु. २००/- रुपयांचे मुद्रांक बंद करुन त्याऐवजी थेट ५०० रुपये किमतीचे मुद्रांक शुल्क राज्य शासनाकडून आकरलाजाणार असल्याचे माहे, ऑक्टोबर २०२४ रोजी निदर्शनास येणे, त्यामुळे राज्य शासनाच्या महसुलात वाढ होणार असणे, त्याअनुषंगाने प्रतिज्ञापत्र, शपथपत्र, हक्क सोड पत्र, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रक्रियेसाठी लागणारे शुल्क, दस्त नोंदणी असेशैक्षणिक व व्यवसायिक करारांसाठी नागरिकांना किमान रु. ५००/- रुपयांचा मुद्रांकांचा वापर करावा लागणार असणे, त्यामुळे राज्यातील कष्टकरी व गरीब जनतेला नाहक भुर्दंड सहन करावा लागणार असणे, मुद्रांक शुल्काच्या वाढीत काही प्रमाणात घट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: सी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५२, सचिवालयीन सर्वसाधरण सेवा**<br>**रूपये:- ८७,५८,०२,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (१०) | २५२ | १०० | अहमद बिल्डिंग टेनन्ट्स को.ऑप.हौ.सोसायटी, मुंबई, माझगांव महसूल विभाग सीएस क्र.३०९ मधील भूखंडावर इमारत क्र.१०,३६/४० अहमद बिल्डिंग ही १०० वर्षे जूनी सेस इमारत असून या इमारतीचा ३०.१२.१९७२ साली भाडेपट्टा संपुष्टात आले असून गेली ५० वर्षापासून येथील गृहनिर्माण संस्था स्वखर्चाने इमारतीचे देखभाल व दुरुस्ती करीत आहेत. सदरहू नियोजित गृहनिर्माण संस्थेने सदर मिळकत संस्थेच्या नावे देखभाल, दुरुस्ती करण्याकरिता मिळकतीचा भाडेपट्टा नुतणीकरण करुन मिळण्याची शासनाकडे मागणी केली आहे. मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री यांना दि.३०.०९.२०२० रोजी प्रस्तावासह निवेदन दिले असता त्यावर जिल्हाधिकारी यांनी ७ वेळा सुनावणी घेऊन उक्त मिळकतीवरील इमारतीचा भाडेपट्टा नुतणीकरण व पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव मंत्रालय, महसूल विभाग यांना शासन पत्र क्र.जमीन-२५२३/१४०/प्रक्र १७/ज-२, दि.०२.०९.२०२४ रोजी जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी त्रुटींची पुर्तता करुन शासकीय मान्यतेसाठी अंतिम प्रस्ताव सादर केला आहे. सदरहू मिळकतीचे भाडेपट्टा शुल्क रक्कम थकीत असेल ती सर्व थकीत शुल्क रक्कम नियोजित गृहनिर्माण संस्था शासनास भरण्यास तयार आहे. सदरहू प्रस्ताव दि.०२.०९.२०२४ पासून मंत्रालय, महसूल विभाग,ज-२ येथे शासकीय मंजूरीसाठी प्रलंबित आहे. याबाबत शासनाने करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक न्याय व कल्याण**<br>**रूपये:- १,०६,५५,७३,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (११) | २९० | १० | सांगली जिल्हयातील पलूस-कडेगांव देवराष्ट्रे हे स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे जन्म गाव असून त्याठिकाणी स्व. चव्हाण साहेबांचे स्मारक आहे. प्राचीन काळापासून श्री, क्षेत्र सागरेश्वर मंदिर हे तीर्थक्षेत्र असणे, मंदिर परिसरात ५१ मंदिरांचा समूह आहे. त्यालगतच मानव निर्मित यशवंतराव चव्हाण वन्यजीव अभयारण्य १०.८४ चौरस कि.मी. क्षेत्रावरती असून या ठिकाणी तीर्थक्षेत्र, पर्यटन व प्रेक्षणीय स्थळे असलेने भाविक व पर्यटकांची मोठ्याप्रमाणावर गर्दी असणे, त्याचबरोबर वन्यजीव संपत्ती उदा. हरीण, सांबर, काळवीट, भेर, तरस इ. मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळत असणे, मागील काही वर्षापासून उन्हाळ्याच्या कालावधीत चारा व पाण्याच्या शोधात अभयारण्यातील हरीण, काळवीट हे प्राणी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कुंपण नसल्याने लगतच्या गावातील शेती पिकांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान होत असणे, त्यामुळे परिसरातील शेतकरी हतबल आहे. तसेच वन्यप्राण्याची जीवितहानी सुद्धा होत असणे, या ३ कि. मी. क्षेत्रासाठी कुंपण नसलेने अत्यावश्यक त्याठिकाणी कुंपण करणे गरजेचे असून यासाठी तातडीने निधी देण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**रूपये:- ३६,८४,४६,०७,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (१२) | १८३ | १० | महाराष्ट्र राज्यातील अनेक भागांमधील वनविभागाच्या जागेवर होणारे अतिक्रमण रोखण्यास वनविभागाला अपयश येत असून वारंवार कारवाई करूनही अतिक्रमणाचा प्रश्न सुटेनासा झाला आहे. उलट दिवसेंदिवस वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण वाढत चालल्याने वनसंपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होऊ लागली आहे. वन विभागाकडून अतिक्रमणावर ठोस कारवाई केली जात नसल्याने भूमाफियांना कारवाईचा कोणताही धाक राहिलेला नाही. सबब वनविभागाच्या जागेवर होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१३) | १५९ | १० | उमरेड मतदार संघात अभयारण्य आहे, त्यामुळे संपूर्ण परिसरातील शेतात वन्य प्राणी यांचा वावर जास्त प्रमाणात होत असते, त्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत असते, आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असते, त्यामुळे यावर प्रतिबंध करणे आवश्यक आहे त्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीला तार कुंपण,करणे, संवरक्षण भिंत उभारण्यासाठी शासनाच्या वतीने यासाठी विशेष भरीव निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच उमरेड मतदार संघातील गावांना तारेचे कुंपण मिळावे म्हणून शेतकरी, शासनाने नीधी उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: सी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १३,७४,४६,३२,०००/-**<br>**डॉ. नितिन राऊत** |
| (१४) | ३१७ | १० | विदर्भामध्ये अडीज टक्के जमीन वन असणे, वाघाची पंढरी म्हणून राज्यात विदर्भाची ओळख असणे, पण विदर्भातील वन प्राण्यांचे संरक्षण होत नसणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ या पाच जिल्ह्यांत वेगवेगळया कारणांनी ०७ वाघांच्या मृत्यूची नोंद झाली असणे, वाघांच्या संरक्षण व संवर्धनासाठी उपाययोजना करण्याची आवश्यक्ता, याबाबात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई